भाकृअनुप
ICAR

JNIESTR NANDED, ATARI PUNE, ICAR NEW DELHI

## कृषि विज्ञान केंद्र नांदेड-१

# रानभाज्यांची माहिती

## करटोली



शास्त्रीय नाव : Momordica dioica

कुळ : Cucurbitaceace

स्थानिक नाव : कटोली,कटुर्ल रानकारली,कर्कोटकी इ.



उपयोग –

- डोकेदुखीत पानांचा अंगरस,मिरी,रक्तचंदन आणि व नारळाचा रस एकत्र करून चोळतात.
- मुतखडा,सर्व प्रकारची विषबाधा,हत्तीरोग या विकारांत कंदाचा वापर करतात.
- करटोलीची पाने ताप,दमा,दाह, उचकी,मुळव्याध यात गुणकारी आहेत.
- भाजी रूचकर असुन पोट साफ होण्यासाठी उपयुक्त आहे.
- मधुमेहामध्ये या भाजीचे नियमित सेवन केल्यास रक्तातील साखर कमी होते.
- मुळव्याध मधील वरचेवर रक्तस्त्राव वेदना ठणका यामध्ये भाजी अत्यंत हितकारक आहे.

## सुरण

शास्त्रीय नाव : Amorphophallus Paeoniifolius

कुळ : R.A.C.



उपयुक्त भाग : कंद,मुळ,पाने इ.

कालावधी : बहुवार्षिक (कंद)



औषधी गुणधर्म –

- सुणात अ.ब.क.ही जीवनसत्वे आहेत.
- कंद लोणच्याच्या स्वरूपात वायू नाशी समजला जातो.
- आतडयांच्या रोगात सुरणाची भाजी गुणकारी आहे.
- दमा,मुळव्याध,पोटदुखी,हत्तीरोग व रक्तविकारांवर भाजी उपयोगी आहे.

## पिंपळ



शास्त्रीय नाव : Ficus religiosa

इंग्रजी नाव : Piple

स्थाकि नाव : अश्वत्थ, पिप्पल बोधिम

कुळ : Moraceae

आढळ : हे वृक्ष मध्य भारत,पश्चिम बंगाल व हिमालयाच्या पायथ्याशी आढळतात.

औषधी गुणधर्म –

- पिंपळाची साल,सालीची राख,कोवळी व सुकी पाने, फळे व बिया औषधात वापरतात.
- पिंपळाची साल रक्तसंग्राही व पौष्टिक आहे.
- फळे पाच व रक्त शुध्दी करणारी आहेत.
- पिकलेले पान विडयाच्या पानातुन काविळीत देतात.
- मुळाची साल मधात घासून मुलांच्या मुखरोगात व्रणावर लावतात. पित्तकोपातही पिंपळ उपयुक्त आहे.
- कोवळी अंतर्साल अस्थिभंगावर उपयोगी आहे.

## दिंडा

शास्त्रीय नाव : Leea Macrophylla

स्थाकि नाव : ढोलसमुद्रिका

कुळ : Leeaceae

आढळ : ही प्रजात पश्चिम घाट कोकण, मराठवाडा, विदर्भ या भागातील जंगलात आढळते.



औषधी गुणधर्म –

- व्रणरोपक म्हणुन दिंडा ही वनस्पती प्रसिध्द आहे.
- औषधात दिंडयाचे मुळ वापरतात.
- वनस्पतीत ग्राही,वेदनास्थापन आणि रक्तस्कंदन हे इतर औषधी गुणधर्म आहेत.
- कंदाचा लेप नायटयावरही प्रसिध्द आहे.

## टाकळा



शास्त्रीय नाव : Cassia Tora

इंग्रजी नाव : Foetied Cassia

स्थाकि नाव : तरोटा, तरवटा

कुळ : Caesalpinaceae

आढळ : टाकळा हे तण पडीक ओसाड सर्वत्र वाढलेले असते. टाकळा ही वनस्पती उष्ण कटिबंधातील सर्व देशांत आढळते.

औषधी गुणधर्म –

- टाकळयाच्या पानांत विरेचन द्रव्य व लाल रंग असतो.
- टाकळा सर्व प्रकारच्या त्वचारोगात देतात.
- बिया लिंबाच्या रसातून वापरण्याचा प्रघात आहे.
- पानांचा काढा दातांच्या वेळी मुलांना येणाऱ्या तापावर निर्देशित करतात.
- पित्तज,हृदयविकार,श्वास,खोकला यात पानांचा रस मधातून देतात.
- त्वचा जाड झालेली असल्यास याचा विशेष उपयोग करतात.
- पानांची भाजी गुणाने उष्ण असल्याने शरीरातील वात व कफदोष कमी होण्यास मदत होते.

## कुडा

शास्त्रीय नाव : Holarrhena Pubescens



इंग्रजी नाव : Konesi Bark Tree

स्थाकि नाव : पांढरा कुडा

कुळ : Apocynaceae

आढळ : ही वनस्पती महाराष्ट्रात बहुतेक सर्व ठिकाणी पर्णझडी जंगलात आढळतात.

औषधी गुणधर्म –

- पांढरा कुडा ही महत्वाची औषधी वनस्पती असुन औषधात मुळाची साल व बिया वापरतात.
- कुष्ठरोग,त्वचारोग, यात गुणकारी आहे. धावरे, रक्तस्त्रावयुक्त मुळव्याध,थकवा यामध्ये कुडयाच्या बिया उपयुक्त आहेत.
- बियांचे चुर्ण चिमुटभर रोज खाल्यास अन्न जिरते, पोटात वायु धरत नाही.
- अतिसार,ताप कावीळ, कुष्ठरोग,कफ,त्वचाविकार, पित्तकोष यात साल गुणकारी आहे.
- पाने स्तंभक,दुग्धवर्धक व शक्तिवर्धक असुन स्नायुंचे दुखणे कमी होतात.

## गुळवेल



शास्त्रीय नाव : Tinospora Cordifolia

इंग्रजी नाव : Heart Leaved Munseed

स्थाकि नाव : गरूडवेल,अमृतवेल,अमृतवल्ली इ.

कुळ : Menispermacea

आढळ : ही बहुवर्षायु वेल महाराष्ट्रात सर्वत्र आढळते.

औषधी गुणधर्म –

- गुळवेल महत्त्वाची औषधी वनस्पती असुन तीची खोडे अनेक रोगांवरील औषधात वापरतात.
- गुळवेल कटुपौष्टिक, पित्तसारक, संग्राहक, मूत्रजनन, ज्वरहर व नियतकालिकज्वरनाशक गुणधर्माची आहे.
- ही वनस्पती ताप,तहान,जळजळ, वांती यावर उपयुक्त आहे.
- गुळवेलीचे सत्व व काढा वापरतात.
- ती रक्तसुधारक असून पित्तवृध्दीच्या काविळीत गुणकारी त्वचारोगात उपयोगी आहे.
- मधुमेह, वारंवार मुत्रवेग, कुष्ठ व वातरक्त विकारातही उपयुक्त आहे.

## आंबुशी



शास्त्रीय नाव : Oxalis Corniculata

इंग्रजी नाव : Indian Sorrel

स्थाकि नाव : आंबुटी,आंबाती आंबटी, भुईसर्पटी इ.

कुळ : Menispermacea

आढळ : आंबुशी हे प्रामुख्याने बागेत जागी तसेच कुडयातून तण वाढणारे तण आहे. ही भाजी महाराष्ट्रात सर्वत्र आढळते.


औषधी गुणधर्म –

- आंबुशी गुणाने रूक्ष व उष्ण आहे, पचनास हलकी असुन चांगली भूकवर्धक आहे.
- आंबुशीच्या अंगरसाने धमन्यांचे संकोचन होऊन रक्तस्त्राव बंद होतो.
- चामखीळ आणि नेत्रपटलाच्या अपारदर्शकतेत पानांचा रस बाह्य उपाय म्हणुन वापरतात.
- ताज्या पानांची कढी उपचाच्या रोग्यांना पाचक आहे.
- आंबुशी वाटुन सुजेवर बांधल्यास दाह कमी होऊन सूज उतरते.
- धोतऱ्याचे विष चढल्यास आंबुशीचा रस उतार म्हणुन देतात.
- कफ,वात आणि पूलत्याध यात आंबुशी गुणकारी आहे.

## पाथरी

शास्त्रीय नाव : Launea Procumbens

कुळ : ॲस्टरोएसी



उपयुक्त भाग : पाने

कालावधी : वर्षभर

(फुले : नोव्हेंबर-डिसेंबर)

औषधी गुणधर्म –

- पाथरीचा अंगरस जेष्ठमधाबरोबर दिल्यास बाळंतिणीचे दूध वाढते.
- चारा म्हणुन वापरल्यास जनावरांचे दूध वाढते.
- हे चाटण सुक्या खोकल्यास उपयुक्त आहे.
- भाजीने पित्ताचा त्रास कमी होतो.
- काविळ व यकृत विकारात ही भाजी उपयुक्त आहे.

## भुईआवळी





शास्त्रीय नाव : Phyllanthus amarus

कुळ : Euphorbiaceae

आढळ : भुईआवळी पावसाळयात सर्व सर्व प्रकारच्या हवामाानात आढळते.

औषधी गुणधर्म –

- कावीळ झाल्यास भुईआवळी वाटुन दुधाबरोबर सकाळ संध्याकाळ देतात.
- भुईआवळीने लघवीचे प्रमाण वाढते व दाह कमी होतो.
- भुईआवळीचा वापर यकृतवृध्दी व प्लीहावृध्दी कमी करण्यास करतात.

## शेवगा



शास्त्रीय नाव : Moringa Oleifera

कुळ : मारिंगेएसी

उपयुक्त भाग : पाने,शेंगा, फुले मूळ.

कालावधी : वार्षिक (वृक्ष) बाहर-जानेवारी ते एप्रिल

औषधी गुणधर्म :

- यामध्ये दुधाच्या चौपट कॅल्सियम, सयंत्राच्या सहापट क जीवनसत्व व केळयाच्या तीनपट पोटॅशियम तसेच लोह व प्रथिनेही असतात.
- यामध्ये जंतूनाशक गुणधर्म असून मधुमेह व उच्च रक्त दाबावर उपयुक्त.
- मुळाच्या सालीचा रस कानदुखीत वापरतात. पानांच्या भाजीमुळे सूज, जंत, गळू हे आजार बरे होतात. कृमिनाशक म्हणुन उपयुक्त.
- शारिरीक व मानसिक थकवा, जडपणा या भाजीने कमी होतो.

## अळु



शास्त्रीय नाव : Colocasia esculenta

कुळ : Araceae

स्थानिक नावे : आरवी

- अळू ही कंदवर्गीय वनस्पती आहे याच्या दोन जाती आहेत. एक हिरवट पांढरी व दुसरी काळी

औषधी गुणधर्म :

- आळूची काळी जात औषधात वापरतात.
- पानांचे देठ मिठाबरोबर वाटुन सुजलेल्या गाठी लेप करतात.
- आळचा रस जखमेवर चोळल्याने रक्त वाहने बंद होऊन जखमही लवकर भरून येते.

## केना

शास्त्रीय नाव : Commelina Benghalensis

कुळ : कॉमिलीनिएसी



उपयुक्त भाग : पाने

कालावधी : वार्षिक

औषधी गुणधर्म –

- या भाजीमुळे पचनक्रिया होऊन पोट साफ होते.
- त्वचाविकार, सूज इ. विकार कमी होतात.
- भाजीमुळे लघवी साफ होण्यास मदत होते.

## पानांचा ओवा



शास्त्रीय नाव : Plectranthus amboinicus

इंग्रजी नाव : Aromatic Coleus

आढळ : वनस्पतीचे नाव पानांचा ओवा असे आहे कारण पानांचा ओव्यासारखा वास येतो. वनस्पतीची लागवड बागेत करतात.

औषधी गुणधर्म –

- पानांचा औषधात वापर करतात पेयजलांना सुवासिक वास येण्यासाठी पानांचा उपयोग करतात.
- गुरांसाठी औषध म्हणुन वापरतात.
- पोटदुखी, अपचन, कुपचन,पोटशुळ यामध्ये एखादे पान दिल्यास गुण येतो.
- नेत्रभिष्यन्दात पापण्यावर पानांचा रस लावतात किटकदंशावर गुणकारी दमा, जुनाट खोकला, फेपरे इ. संकोचप्रधान रोगात उपयोगी.

## मायाळु



शास्त्रीय नाव : Basella Alba

इंग्रजी नाव : Malbar Night Shade Indian

स्थानिक नाव : बेलबोंडी

कुळ : Basellaceae

आढळ : मायाळू या बहुवर्षीय वेलाची बागेत, आंगणात,परसात तसेच कुंडीत सर्वत्र लागवड करतात.

औषधी गुणधर्म –

- मायाळू ही औषधी वनस्पती असुन ती शितल व स्नेहन आहे.
- ही वनस्पती तुरट,गोडसर,स्निग्ध, निद्राकार, कामोत्तेजक चरबीकारक, विरेचक व भुकवर्धक आहे.
- मायाळू कफकारक,मादक व पौष्टिक आहे.

## कपाळफोडी



स्थानिक नाव : कपाळफोडी

कुळ : सॅपिनडिएसी

उपयुक्त भाग : पाने

कालावधी : वार्षिक (वेलवर्गीय फुले : ऑक्टोबर-डिसेंबर)

औषधी गुणधर्म –

- केशसंवर्धनासाठी वापरतात.
- कानदुखीत कानफुटीत कानात पू झाल्यास पानांचा रस कानात घालतात.
- मासिक पाळी नियमित होत नसल्यास अंगावरून कमी जात असल्यास.
- जुनाट खोकला, छाती भरणे या विकारात उपयुक्त आमवातात मुळांचा काढा करतात.
- पान एरंडेल तेलात वाटुन सुजलेल्या सांध्यावर बांधतात.


पत्ता : कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी,पूर्णा रोड,नांदेड. Email : kvk_nanded@yahoo.co.in www.kvknanded.com


सौजन्य : कृषि विभाग, महाराष्ट्र शासन